

# श्री संत तुकाराम अभंगवाणी-विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म

https://www.chalisa.online

(सांवळें सुंदर रूप मनोहर
राहो निरंतर हृदयीं माझे ।

आणीक कांहीं इच्छा आह्मां नाहीं चाड
तुझें नाम गोड पांडुरंगे ॥)

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेदभ्रम अमंगळ ॥१॥

अइका जी तुह्मी भक्त भागवत ।
कराल तें हित सत्य करा ॥२॥

कोणाही जिवाचा न घडो मत्सर ।
वर्म सर्वेश्वरपूजनाचें ॥३॥

तुका ह्मणे एका देहाचे अवयव ।
सुखदुःख जीव भोग पावे ॥४॥

|| https://www.chalisa.online ||